महाराष्ट्र शासन
जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर.
ईमेल आयडी—mahkoldc@mhstate.nic.in दुरध्वनी क्रमांक ०२३१—२५४५९७४

ई—निविदा सुचना

जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील पोक्सो न्यायालय क्र.१ व २ करिता दोन वर्ष मुदतीच्या कालावधीकरीता लिपीक टंकलेखक—६ व शिपाई—४ यांची कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्धतेसाठी दोन वर्षाच्या करारासाठी नोंदणीकृत कंत्राटदारांकडुन ई निविदा मागविण्यात येत आहेत.

विस्तृत निविदा सुचना व त्यासंबंधीच्या अटी व शर्तीसह दिनांक २४/०८/२०२६ रोजी सकाळी ११.०० वा. पासून ते दिनांक ०७/०९/२०२६ रोजी दुपारी १.३० वाजेपर्यंत महाराष्ट्र शासनाचे http://www.mahatenders.gov.in तसेच http://www.districts.ecourt.gov.in//kolhapur या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

ठिकाण: कोल्हापूर

(आ. म. पाटील)
प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
कोल्हापूर

महाराष्ट्र शासन
जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर.

ई–निविदा कार्यप्रणाली निविदा सूचना क्र. District Court Kolhapur A-1, HO Kolhapur 26-27 अंतर्गत जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर (दूरध्वनी क्र.२५४५९७४) येथील पोक्सो न्यायालय क्र.१ व २ करिता दोन वर्ष मुदतीच्या कालावधीकरीता खालील पदांच्या (लिपीक टंकलेखक–६ व शिपाई–४) कंत्राटी पध्दतीने सेवा उपलब्धतेसाठी ई–निविदा प्रणालीद्वारे पात्र निविदाकारांकडून ऑनलाईन निविदा मागविणेत येत आहेत.

अ. क्र.	कामाचे नाव	कामाचे स्वरुप	पदसंख्या	एकत्रित कामाची अंदाजित एकूण रक्कम रुपये
१	जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील पोक्सो न्यायालय क्र.१ व २ करिता कंत्राटी पध्दतीने लिपीक टंकलेखक पदांकरिता.	दिवाणी व फौजदारी प्रकरणे हाताळणे व प्रलंबीत प्रकरणांची यादी तयार करणे, न्यायालयीन कामकाजामध्ये मदत करणे, अधिक्षक / वरिष्ठ लिपीक यांना मदतनीस म्हणुन काम करणे. **(तसेच सदर अटी व शर्तीमधील परिशिष्ठ क्र. २ मध्ये दिलेल्या यादी प्रमाणे)**	६	५२,०७,३२८/–
२	जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील पोक्सो न्यायालय क्र.१ व २ करिता कंत्राटी पध्दतीने शिपाई पदांकरिता.	न्यायालयातील दैनंदिन खटल्यांचा पुकारा करणे, न्यायालयीन कामकाजामध्ये मदत करणे, न्यायालयाअंतर्गत स्वच्छता करणे या कामांकरीता शिपाई या पदाच्या सेवा बाह्ययंत्रणेव्दारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन देणे. **(तसेच सदर अटी व शर्तीमधील परिशिष्ठ क्र. २ मध्ये दिलेल्या यादी प्रमाणे)**	४	२७,२२,५६०/–
			एकूण...	७९,२९,८८८/–

टिप :– १) सदरची निविदा ही जिल्हा न्यायालय कोल्हापूर येथील पोक्सो न्यायालय क्र.१ व २ करिता लिपीक टंकलेखक–६ व शिपाई–४ या पदांकरिता एकत्रित समजण्यात यावी.

२) सदरची निविदा भरताना एकत्रित निविदा इसारा रक्कम रु.१,००,०००/– नेटबॅकिंग प्रणालीने भरावयाची आहे.

३) निविदा फी रु.१०,०००/– नेट बॅकिंग प्रणालीने भरावयाची आहे.

४) ई निविदा पोर्टलवर **'बीड लॉक'** झाल्यानंतर तांत्रीक निविदांबाबत **'हार्ड कॉपी'** सत्यप्रतीसह एका प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात **(दिनांक: १०/०९/२०२६ इ. रोजी दुपारी १:३० वाजेपर्यंत)** सादर करणे अनिर्वाय आहे.

...२...

: निविदेचे वेळापत्रक :

निविदा डाउनलोड करण्याचा कालावधी	:	२४/०८/२०२६ (वेळ ११.००) ते ०७/०९/२०२६ (वेळ १.३०) वाजेपर्यंत
तांत्रीक निविदा उघडण्याचा दिनांक व मुळ दस्तऐवज सादर करण्याचा दिनांक	:	दिनांक १०/०९/२०२६ दुपारी ३.०० वा.
तांत्रीक निविदा उघडण्याचे ठिकाण	:	करवीर निवासिनी हॉल, जिल्हा व सत्र न्यायालय, कसबा बावडा, कोल्हापूर.
आर्थिक निविदा उघडण्याचा दिनांक	:	तांत्रीक निविदेतील कागदपत्रांची पडताळणी झाल्यानंतर आर्थिक निविदा उघडणेबाबत निविदाधारकांना कळविणेत येईल.

टीप :

१. सर्व पात्र/इच्छुक निविदाकरांनी निविदापत्रक डाउनलोड करण्यासाठी व निविदा प्रक्रियेत भाग घेणेसाठी ई निविदा प्रणालीच्या mahatenders.gov.in वर enrolled करणे आवश्यक आहे.

२. निविदाकारांना वर नमूद केलेल्या संकेतस्थळावर ऑनलाईन देकार भरणे संदर्भात व डिजीटल प्रमाणपत्र वितरीत करण्यासंदर्भात काही शंका/अडचणी असल्यास त्यांनी खालील दूरध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा.....०१२०—४००१—००२.

३. निविदाकारांनी निविदा संदर्भात सर्व दस्तऐवज ऑनलाईन सादर करणे अनिवार्य राहील. तसेच इसारा रक्कम अथवा निविदा बयाणा रक्कम online पध्दतीने भरणेची आहे. सदर बयाणा रक्कम http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावरही भरता येईल. अन्यथा ऑनलाईन निविदा उघडण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

४. संस्था नोंदकणीकृत असावी आणि वस्तु व सेवा कर भरणारी असावी.

५. इतर अटी व शर्ती ई—निविदा नमुन्यामध्ये पहावयास मिळतील. सदर कामांची एक अथवा सर्व ई—निविदा कोणतेही कारण न देता रद्द करण्याचे अधिकार सक्षम अधिकारी यांनी राखून ठेवलेले आहेत.

६. वरील निविदा http://mahatenders.gov.in या वेबसाईटवर पहायला मिळेल.

७. शासन निर्णय विधि व न्याय विभाग, ३ सप्टेंबर, २०१४, विधी व न्याय विभाग दि. २७ जानेवारी, २०१५, विधी व न्याय विभाग दि. २३ फेब्रुवारी २०१७, विधी व न्याय विभाग दि. ९ ऑगस्ट, २०१७, शासन निर्णय वित्त २ ऑगस्ट, २०१६ व शासन निर्णय क्रमांक—पदनि—२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क, दि.२७ एप्रिल, २०२२ या शासन निर्णयांच्या अधिन राहुन निविदा भरणेची आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
जिल्हा व सत्र न्यायालय,
कोल्हापूर.

अटी व शर्ती

बयाना रक्कम (Earnest Moeny Deposit)- (Technical Bid envelop)

खालील नमुद केलेल्या बाबींची पुर्तता निविदाकराकडुन न झाल्यास सदर निविदाकाराची बयाणा रक्कम जप्त करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

अ. निविदा स्विकारण्याच्या अंतिम दिनांकानंतर निविदा किंवा प्रस्ताव मागे घेणे किंवा त्यात फेरफार करणे.

ब. करारावर सही न करणे.

क. निविदा किंवा प्रस्ताव स्विकारण्यात आल्यानंतर करारानुसार कामगिरीसाठी आवश्यक सुरक्षा अनामत न भरणे.

ड. निविदा दस्तावेजामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे करारावर सही करण्यापुर्वी कोणत्याही अन्य अटींची पुर्तता न करणे.

अनामत रक्कम—

यशस्वी निविदाकाराला निविदा रक्कमेच्या ३ टक्के अनामत रक्कमेचा राष्ट्रीयकृत बॅकेचा डिमांड ड्राफ्ट '**प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, कोल्हापूर** या नावे जमा करावा लागेल.

निविदा प्रक्रिया —

संपुर्ण निविदा प्रक्रिया ऑनलाईन ई—निविदा असुन ती, तांत्रीक निविदा लखोटा **(Technical Bid Envelop)** व आर्थिक निविदा लखोटा **(Financial Bid Envelop)** अशा दोन लखोटा पध्दतीत राहील.

अ) तांत्रीक निविदा—

१) निविदा अर्जाचे शुल्क व बयाणा रक्कमेचा भरणा शासकीय नियमाप्रमाणे केला असणे आवश्यक. **(Tender Form Fee & E.M.D.)**

२) कंपनीचे/ संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र. **(Registration Certificate)**

३) पॅन कार्ड **(Pan Card)**

४) मागील तीन वर्षाचे आयकर प्रमाणपत्र व ताळेबंद उदा.२०२३—२०२४ ते २०२५—२०२६.

५) प्रोफेशनल टॅक्स **(Professional Tax)** प्रमाणपत्र.

६) सेवा कर **(GST Registration)** प्रमाणपत्र.

७) ई.पी.एफ. **(Employees Provident Fund)** नोंदणी प्रमाणपत्र.

८) ई.एस.आय.एस. **(Employees State Insurance Scheme)** नोंदणी प्रमाणपत्र.

९) कामगार परवाना **(Labour License)** नोंदणी प्रमाणपत्र.

१०) निविदाकाराने सफाई कामगार यांची सेवा केंद्र शासन/ महाराष्ट्र शासन वा इतर अन्य आस्थापनांमध्ये पुरविली असल्यास याबाबतचे संबंधित कार्यालयाचे जारी कलेले कार्यादेश आणि कामाच्या अनुभवाच प्रमाणपत्र सादर करावे. **(Experience Certificate)**

११) निविदा अटी व शर्तीसी निविदाकराची सही व शिक्का.

तांत्रीक निविदेमध्ये नमुद केलेली सर्व कागदपत्रे वर दिलेल्या क्रमानेच सादर करण्यात यावी. तसेच अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या छायाकिंत प्रती तांत्रीक पडताळणीकरिता सादर करण्यात याव्यात. कंत्राटदाराने निविदा अर्जासोबत सदर प्रमाणपत्रे सादर न केल्यास, निविदा अर्ज निविदा प्रक्रियेतून बाद ठरविण्यात येईल.

सर्वप्रथम तांत्रीक निविदा उघडण्यात येईल. तांत्रीक निविदा उघडताना निविदाकार अथवा त्यांचे अधिकृत प्रतिनिधी हजर राहणे आवश्यक आहे व त्यावेळेस त्यांनी प्रमाणपत्राच्या मुळ प्रती पडताळणीसाठी हजर ठेवणे आवश्यक आहे. जर निविदाकार तांत्रीक निविदेमध्ये नमुद केलेल्या बाबींची पुर्तता करीत नसेल तर त्याची निविदा अपात्र ठरविण्यात येईल व सदर निविदाकाराची आर्थिक निविदा पुढील कार्यवाहीसाठी ग्राहय धरण्यात येणार नाही. तसेच पात्र ठरणा–या निविदाकरांचीच आर्थिक निविदा उघडण्यात येईल. निविदेमध्ये नमुद केलेली निविदा स्विकारण्याची व उघडण्याची तारीख पुढील कार्यालयीन दिवस व नियोजित वेळेस राहील. आर्थिक निविदेमधील रक्कम तांत्रीक निविदेमध्ये नमुद करण्यात येउ नये. जर तसे आढळल्यास संबंधीत निविदाकाराची निविदा बाद ठरविण्यात येईल.

<u>अ) आर्थिक निविदा–</u>

१. निविदेचे दर हे दरपत्रक (BOQ) यामध्ये सर्व करासहीत नमुद करावेत.

२. आर्थिक निविदेमध्ये निविदाकराने नमुद केलेले दर निविदेमधील सर्व अटी व शर्तींची पुर्तता करीत असेल, तर पुढील कार्यवाहीसाठी निविदा ग्राहय धरण्यात येईल.

३. निविदा स्विकारण्याचा अधिकार या कामासाठी नियुक्त केलेल्या निवड समितीला असतील व कोणतेही कारण न देता एक किंवा सर्व निविदा नाकारण्याचा अधिकार सदर निवड समितीला असेल.

क) सर्वसाधारण अटी व शर्ती –

१. कंत्राटदाराने न्यायालयाचे कामकाजासाठी नेमलेल्या कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायदयातील तरतुदींपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले, तर संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायदयातील तरतुदीप्रमाणे कारवाई करण्यात येईल व त्यांचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्यांचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

२. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना कामाचे वेतन व त्या अनुषंगीक इतर सर्व भत्ते रोख स्वरुपात अदा न करता संबंधीत कंत्राटी कामगाराच्या नावाने रेखांकित धनादेशाद्वारे अदा करावेत.

३. कंत्राटदाराने कंत्राटी कामगाराला दिलेल्या धनादेशाची, छायांकित प्रत, सदर धनादेश स्विकारल्याची कंत्राटी कामगाराची स्वाक्षरी असलेले वेतन देयक (ज्यावर सदर धनादेश क्रमांक लिहीलेला असेल), कंत्राटदाराने दरमहा संबंधीत कार्यालयात सादर करावे लागतील. जोपर्यंत कंत्राटदार वरील कागदपत्रे सादर करणार नाहीत, तोपर्यंत त्या महिन्याचे कंत्राटदाराचे देयक अदा करण्यात येणार नाही.

४. कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत दोन वर्षापेक्षा जास्त राहणार नाही.

५. किमान वेतन कायदयातील तरतुदीनुसार कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहिक सुट्टी देणे बंधनकारक असेल व अशा सुट्टीचे दिवशी कार्यालयास कंत्राटी कामगारांच्या सेवेची आवश्यकता भासल्यास त्याचे ऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

६. सुट्टीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडुन काम करुन घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी. मात्र अशी बदली रजा देताना त्यादिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होवू नये म्हणुन दुस–या कामगाराची सोय करण्याची संपुर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

७. शासकीय कामाचे वेळनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीन भत्ता देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालीन भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

८. कंत्राटदारास त्यांनी नेमलेल्या कंत्राटी कामगार यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतुदीनुसार वेतन, इतर सवलतील व सेवा शर्ती लागु करणे बंधनकारक असेल.

९. ज्या कंपनीस/ संस्थेस काम सोपविण्यात येईल त्यांनी त्या बाबतच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील.

१०. कंपनी/ संस्थेतर्फे काम करणा—या कर्मचा—यांचे सेवेचे कोणतेही उत्तरदायीत्व शासनावर किंवा या कार्यालयावर राहणार नाही.

११. सदरील निविदा शासनाकडुन प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर ती अंमलात येईल.

१२. कंत्राटदारामार्फत दिल्या जाणा—या सेवा/सुविधा इत्यादीबाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

१३. न्यायालयास कंत्राटी पध्दतीवर पुरविण्यात येणा—या सोई—सुविधा/काम यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे, त्याअनुषंगाने लागु असणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

१४. कंत्राटदार संस्था/कंपनी यांनी कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देताना, शासन निर्णय विधि व न्याय विभाग, ३ सप्टेंबर, २०१४, विधी व न्याय विभाग दि. २७ जानेवारी, २०१५, विधी व न्याय विभाग दि. २३ फेब्रुवारी २०१७, विधी व न्याय विभाग दि. ९ ऑगस्ट, २०१७, शासन निर्णय वित्त २ ऑगस्ट, २०१६ व शासन निर्णय क्रमांक—पदनि—२०२२/प्र.क्र.१५/आ.पु.क दि. २७ एप्रिल, २०२२ मधील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे. सदर शासन निर्णय शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

१५. उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना काम देण्यात येणार आहे, त्यांना नियमित शासकीय कर्मचा—यांप्रमाणे नियम व अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचा—यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगिक लाभ अनुज्ञेय/लागु राहणार नाहीत. त्यांचा सेवा कालावधी किंवा कर्तव्य कालावधी व मानधनाबाबत हे कार्यालय कसल्याही प्रकारे जबाबदार राहणार नाही.

...७...

१६. नियुक्ती प्राधिका—याने सुचविलेली सर्व कामे तसेच आयत्यावेळी कामाचे स्वरुप बदलल्यास त्याप्रमाणे, कंत्राटदार संस्था/कंपनी यांनी कामे करुन देणेचे त्यांचेवर बंधनकारक राहिल.

१७. कंत्राटदाराने कंत्राटी कामगार पुरविताना त्यात बाल कामगारांचा समावेश होणार नाही याची दक्षता घ्यावी.

१८. कंत्राटदाराने अर्जासोबत आवश्यक ती बयाणा रक्कम शासकीय नियमाप्रमाणे जमा करावी लागेल.

१९. कंत्राटदाराने/संस्थेने/कंपनीने त्यांचे तांत्रीक निविदेतील सर्व कागदपत्राची साक्षांकित प्रत निविदेसोबत सादर करणे बंधनकारक आहे. सदर कागदपत्रे न जोडल्यास त्यांचा निविदा अर्ज रद्द ठरविण्यात येईल.

२०. कंत्राटदारास कंत्राटी कामाचा मोबदला अदा करताना त्यातुन नियमाप्रमाणे आयकर कापून घेणेत येईल.

२१. कंत्राटी कामगारांनी कार्यालयात काम करताना त्यांच्या नजरेस ज्या काही बाबी येईल, त्या कार्यालयीन बाबी आहेत याची जाणीव ठेवून त्यासंबंधात आवश्यक ती गोपनियता ठेवणे, तसेच न्यायालयीन कामकाजात कोणत्याही प्रकारचा हस्तक्षेप होणार नाही याची दक्षता घेणे, याबाबी कंत्राटदारावर बंधनकारक राहतील.

२२. कंत्राटदारामार्फत नेमलेल्या कंत्राटी कामगारांकडुन सरकारी मालमत्तेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास, नुकसान भरपाईची रक्कम कंत्राटदार यांना देय असलेल्या रक्कमेतुन वसुल करणेत येईल.

२३. केवळ ई—निविदा भरतील म्हणुन कंत्राटावर हक्क सांगता येणार नाही.

२४. ई निविदा पोर्टलवर **'बीड लॉक'** झाल्यानंतर निविदांबाबत **'हार्ड कॉपी'** एका प्रतीत कंत्राटदारांनी निविदा सादर करावयाच्या वेळेपासून ७२ तासात **(दिनांक: १०/०९/२०२६ इ. रोजी दुपारी १:३० वाजेपर्यंत)** सादर करणे अनिर्वाय आहे.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
जिल्हा व सत्र न्यायालय,
कोल्हापूर.

परिशिष्ट १

शैक्षणिक अर्हता व वयोमर्यादा

जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर आस्थापनेवरील न्यायसंकुल, कोल्हापूर आवारातील पोक्सो न्यायालय क्र. १ व २ या न्यायालयांकरिता बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने लिपिक टंकलेखक – ०६ व बहुउद्देशीय गट–ड कर्मचारी (शिपाई) – ०४ पदांसाठी आवश्यक असणारी शैक्षणिक पात्रता व वयोमर्यादा पुढीलप्रमाणे.

अ. क्र.	पदनाम	शैक्षणिक अर्हता
१	लिपिक टंकलेखक	अ) कोणत्याही मान्यताप्राप्त विद्यापीठातून पदवी असणे आवश्यक. ब) जिल्ह्यातील न्यायालयाच्या प्रादेशिक भाषेचे ज्ञान असणे आवश्यक. क) मान्यताप्राप्त संस्थेमधून ४० श.प्र.मि. इंग्रजी टंकलेखन व ३० श.प्र.मि. मराठी टंकलेखन उत्तीर्ण असणे आवश्यक. ड) एम.एस.सी.आय.टी. उत्तीर्ण असणे आवश्यक.
२	बहुउद्देशीय गट–ड कर्मचारी (शिपाई)	अ) महाराष्ट्र राज्य माध्यमिक शालांत परीक्षा इयत्ता ७ वी उत्तीर्ण

वयोमर्यादा १ ते २ करीता

उमेदवाराची सर्वसाधारण वयोमर्यादा ही कमीत कमी १८ पूर्ण व ४५ पेक्षा जास्त नसावी.

प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश,
जिल्हा व सत्र न्यायालय,
कोल्हापूर.

परिशिष्ट २

कार्यसूची

जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर आस्थापनेवरील न्यायसंकुल, कोल्हापूर आवारातील पोक्सो न्यायालय क्र. १ व २ या न्यायालयांकरिता बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पध्दतीने लिपिक टंकलेखक – ०६ व बहुउद्देशीय गट–ड कर्मचारी (शिपाई)– ०४ पदांसाठी कराव्या लागणा–या कार्याची कार्यसूची पुढील प्रमाणे.

अ. क्र.	१. लिपिक टंकलेखक या पदाची कार्यसूची
१	तजविज बंदाचे काम सांभाळणे.
२	तजविज बोर्ड काढणे व प्रत्येक प्रकरणात झालेल्या कामाचा सी.आय.एस. प्रणालीत रोजनामा भरुन पुढील तारीख भरणे तसेच रोजनाम्याची प्रिंट काढून प्रत्येक प्रकरणाला चिटकविणे.
३	तजविज प्रकरणातील नक्कलेच्या प्रमाणित प्रतींसाठी आलेल्या अर्जातील मागणीप्रमणे मुळ कागदपत्रे मुदतीमध्ये नक्कल विभागाकडे पाठविणे. तसेच नक्कल विभागाकडून परत आलेली मुळ कागदपत्रे पुन्हा प्रकरणांमध्ये त्यांच्या जागेवर लावणे.
४	केस रजिस्टर भरणे, निकाल नोंदवणे.
५	रिमांड बाबतचे सर्व कामकाज करणे, रिमांड रजिस्टर अद्यावत ठेवणे.
६	न्यायालयीन कोठडीतील बंद्याचे (Under Trial Prisoner Register) रजिस्टर विहीत नमुन्यात ठेवणे व त्या रजिस्टर मध्ये रोजच्या रोज आवश्यक ती नोंद घेणे.
७	Under Trial Prisoner लिस्ट तयार करणे.
८	तजवीज बंदावरील प्रकरणांमध्ये मे. साहेबांनी केलेल्या हुकुमाप्रमाणे योग्य ती कामगिरी करणे.
९	प्रलंबित प्रकरणामध्ये प्राप्त झालेले सर्व प्रकारचे रिट ची पुर्तता करणे.
१०	सर्व निकाली प्रकरणांचे मोस्तर तयार करुन निकाल नोंदविणे व फेरिस्त तयार करणे.
११	प्राप्त झालेल्या परिपत्रकाचा योग्य वेळेत निपटारा करणे तसेच सर्व परिपत्रक व इतर फाईल्स अद्यावत ठेवणे.
१२	केसेस मध्ये चार्ज झाल्यानंतर ते प्रकरण व्यवस्थित फाईल करुन अधिक्षक/ शिरस्तेदार यांच्या ताब्यात देणे तसेच चार्ज झालेल्या केसेसमध्ये मुद्देमाल जमा करणेबाबत मुद्देमाल विभागाकडे पत्र पाठविणे.
१३	मा. न्यायाधीशसो यांच्या आदेशाप्रमाणे काम करणे.

अ. क्र.	२. बहुउद्देशीय गट – ड कर्मचारी (शिपाई) या पदाची कार्यसूची
१	कार्यालयात/न्यायालयात तसेच न्यायिक अधिका–यांच्या निवासस्थानी असलेल्या कार्यालयातील साफसफाई करणे, स्वच्छता राखणे.
२	शिपायांच्या कार्यालयीन वेळेनुसार न्यायालय, कार्यालय उघडणे तसेच न्यायालयीन, कार्यालयीन कामकाज संपल्यानंतर ते बंद करणे.
३	मा. न्यायाधीश, प्रबंधक, अधिक्षक, सहायक अधिक्षक तसेच वरिष्ठांच्या निर्देशप्रमाणे काम करणे.

४	शिपायांची नेमणूक ज्या न्यायालयात, कार्यालयात केलेली आहे तेथील न्यायिक अधिकारी, कार्यालय प्रमुख सांगतील ते काम करणे, वकील, पक्षकार, पोलीस व इतर संबंधित लोकांचा पुकारा करणे, टपाल वाटप करणे, मा. न्यायिक अधिकारी यांचे निजी कक्ष येथील झाडलोट, स्वच्छता इ. कामे करणे. तसेच मा. न्यायिक अधिकारी यांचे निवासस्थानात असलेल्या कार्यालयाशी संबंधित सर्व कामे करणे. न्यायिक अधिकारी यांचे दप्तर निवासस्थानातून न्यायालयात तसेच न्यायालयातून निवासस्थानी ने–आण करणे. न्यायिक अधिकारी यांच्या निर्देशाप्रमाणे कामकाज करुन ते कर्तव्य पार पाडणे.
५	न्यायिक अधिकारी, वरिष्ठ, न्यायिक लिपीक व इतर कर्मचारी यांनी दिलेल्या आदेशाचे पालन करणे.
६	न्यायालयीन कर्मचा–यांच्या सुचनेनुसार कार्यालयीन कामकाजात सहाय्य करणे.
७	न्यायिक अधिका–यांनी सांगितलेल्या कामांची कर्तव्यपूर्ती व कार्यालयीन काम करणे.
८	न्यायिक अधिका–यांनी वेळोवेळी दिलेल्या इतर सूचनांचे काटेकोरपणे पालन करणे.
	प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर.

निविदा नमुना

निविदा मागविणाऱ्या कार्यालयाचे नांव : जिल्हा व सत्र न्यायालय, कोल्हापूर

कामाचे स्वरूप : जिल्हा न्यायालय, कोल्हापूर येथील पोक्सो न्यायालय क्र. १ व २ करिता येथे दोन वर्ष मुदतीच्या कालावधीकरीता लिपीक टंकलेखक—६ व शिपाई—४ यांची सेवा बाहययंत्रनेद्वारे कंत्राटी पध्दतीने उपलब्ध करुन घेणेबाबत....

(सदर कामाची सविस्तर माहिती/अटी, शर्ती तसेच कामाचे स्वरुप दर्शविणारे विवरणपत्र सोबत जोडले आहे).

ई—निविदा क्रमांक :District Court Kolhapur A-1, H.O.Kolhapur 26-27

कंत्राटदार संस्थेचे/कंपनीचे नांव :—

कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा संपूर्ण पत्ता :—

कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा संपर्क दूरध्वनी :—

कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा नोंदणी क्रमांक :—

कंत्राटदार संस्थेचा/कंपनीचा सेवा कर क्रमांक:—

कंत्राटदार/संस्थेने पुढील तक्त्याप्रमाणे माहिती भरुन दयावी...

अ. क्र.	न्यायालयाचे नांव	पदसंख्या	कंत्राटी सेवा पुरविणेसाठी कंत्राटदाराने मागणी केलेली एकूण रक्कम (१ वर्षाकरिता खर्च रुपये)	जी.एस.टी. (१ वर्षाकरिता खर्च रुपये)	एकूण रक्कम रुपये (स्तंभ ४+५)	एकूण रक्कम (रुपये) अक्षरी
१	२	३	४	५	६	७
१	जिल्हा न्यायालय, कोल्हापूर (पोक्सो न्यायालय क्र. १ व २ करिता)	लिपीक टंकलेखक पदसंख्या— ६				
२	जिल्हा न्यायालय, कोल्हापूर (पोक्सो न्यायालय क्र. १ व २ करिता)	शिपाई पदसंख्या — ४				
	एकुण					

निविदेची दोन वर्षासाठी होणारी रक्कम : रुपये ...../—

(अक्षरी एकूण रुपये ..... /—)

(कंत्राटदाराचे नांव, सही, शिक्का, दिनांक)

(अ.क्र.४ ते ८ हया स्तंभातील माहिती कंत्राटदाराने भरावयाची आहे.)

टिप:— कंत्राटदार संस्था / कंपनी यांनी कंत्राटी सेवा उपलब्ध करुन देताना महाराष्ट्र शासन यांनी वेळोवेळी निर्गमित करणत आलेल्या शासन निर्णया.मधील निर्देशांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक आहे.